Historicity

International Research Journal


**Chief Patron**

Dr Vasant Shinde

Director/Vice-Chancellor

Deccan College, Deemed University, Pune, Maharashtra

**Editor-In-Chief**

Dr Sanjay Gaikwad (H.O.D)

M.H.Mahadik Arts and Commerce College, Modnimb, Solapur, Maharashtra

**Editor**

Dr Ravikiran Jadhav

D.B.F Dayanand College Of Arts & Science, Solapur, Maharashtra



**Contact Us:**

Dr. Sanjay Gaikwad

40-D, New Santosh Nagar, Vijapur Road, Solapur-413004

Call us on : +91-9422460023 / +91-9850078760

Email Us : g.sanjayjee@gmail.com

ravikiran.rnj@gmail.com

historicityindia@gmail.com

Website : www.lbp.world



Phone No. : +91-9595 359 435 /0217-2372010

Email ID : ayisrj2011@gmail.com

Webbsite : www.lbp.world



ISSN : 2393-8900


# Historicity

International Research Journal

UGC APPROVED


Volume 3 | Issue 5 | January 2017

Impact Factor : 1.4152 (UIF)




Editor In Chief

Dr Sanjay Gaikwad

# Historicity

## International Research Journal

# Certificate of Publication

ISSN 2393-8900

**Impact Factor : 0.4521 (UIF)**

*This is to certify that our Editorial, Advisory, and Review Board Accepted Research Paper of* गुजर विजय भगवान *Topic:-* भारतीय संविधान आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर *The Research paper is Original & Innovative it is Done Double Blind Peer Reviewed. Your Article is Published in The Month of Feb Year 2016.*

**Editor-in-Chief**

**Sanjay Gaikwad**

Historicity Research Journal
Volume 2 | Issue 6 | Feb 2016

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

**Research Article**

# 'भारतीय संविधान आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर'

प्रा.गुजर विजय भगवान
इतिहास विभाग प्रमुख, कला व वाणिज्य महाविद्यालय, वडूज.
संलग्न शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

## प्रस्तावना —

सन १९४५ मध्ये द्वितीय महायुध्दाची समाप्ती झाली आणि भारताला स्वातंत्र्य देण्याच्या संदर्भात चर्चा सुध्दा झाली. या युध्दाच्या समाप्ती बरोबर दुसरी महत्त्वाची घटना घडली ती म्हणजे दि.२४ ऑक्टोंबर १९४५ रोजी संयुक्त राष्ट्र संघाची निर्मिती झाली. आणि तिसरी महत्वाची घटना ब्रिटनमध्ये झालेले सत्तांतर होय. युनोच्या निर्मितीच्या उद्दिष्टांमध्ये प्रमुख उद्दिष्ट असे होते की, ''कोणतेही राष्ट्र पारतंत्र्यात राहणार नाही. जे राष्ट्र पारतंत्र्यात असतील त्यांना स्वातंत्र्य करण्यास सर्वोतोपरी मदत करण्यात येईल. या संदर्भात युनोने महत्वपूर्ण भूमिका घेतल्याचे आढळते'' याच काळात ब्रिटनमध्ये हुजूर पक्षाचे सरकारचा पराभव होवून मजुर पक्षाचे सरकार सत्तेवर आले. ब्रिटन दुसऱ्या महायुध्दात सहभागी झाल्यामुळे त्यांची वित्तहानी फार मोठ्या प्रमाणात झाली होती. तसेच त्याच काळात भारतातील राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीने जोर धरला होता. त्यामुळे ब्रिटनला भारताला स्वातंत्र्य देण्यावाचून पर्याय राहिला नव्हता.

ब्रिटीश शासनाने एक त्रिसदस्यीय शिष्टमंडळ भारतात पाठविले हे शिष्टमंडळ सत्ता हस्तांतरणाचा निर्विध्य मार्ग, पध्दती, प्रक्रिया आणि साधने सुचविण्याच्या हेतूने भारतात पाठविण्यात आले. या शिष्टमंडळाला 'कॅबिनेट मिशन' असे संबोधण्यात येते. या कॅबिनेट मिशनने दि.१६ मार्च १९४६ रोजी सत्ता हस्तांतरणाची आपली योजना घोषित केली. भारताचा भावी राज्यकारभार चालविण्याच्या दृष्टिने संविधान निर्मितीसाठी एक संविधान सभा निर्माण करण्यात यावी असे सुचविले.

## भारतीय संविधानाचे उद्देश / ध्येय :—

''आम्ही भारतीय लोक'' या शब्दांनी सुरूवात होणारे संविधान जनतेच्या अपेक्षांचे व इच्छेचे एक मूर्तस्वरूप आहे. भारतीय संविधानाकडे पाहिल्यास असे दिसते की, समता, बंधुता आणि न्याय या आधारावर समाज व्यवस्था घडविणे हे संविधानाचे उदात्त ध्येय आहे आणि त्यासाठीच संविधानातील प्रत्येक पान 'सामाजिक न्याय' या बाबींशी संबंधित आहे.

## संविधान समितीचे स्वरूप :—

घटना समितीचे आणि त्यातील मसुदा समितीचे कार्य अत्यंत क्लिष्ट आणि गुंतागुंतीचे होते. त्यामध्ये महत्वाची भूमिका मसुदा समितीने म्हणजेच डॉ. आंबेडकरांनी पार पाडलेली आहे. घटनेवर संपूर्ण भारतातून हजारो दुरूस्त्या आणि शिफारशी येत असत. त्या सर्वांचे अत्यंत अभ्यासपूर्ण विश्लेषण करून योग्य तो निर्णय घेण्याचे आव्हान मसुदा समितीपुढे होते. दि.९ डिसेंबर १९४६ला स्थापन झालेली घटना समिती व दि.२९ ऑगस्ट १९४७ ला स्थापन झालेली मसुदा समिती आणि त्याचे अविरत कार्य २ वर्षे ११ महिने आणि १८ दिवस चालले. ''२९ ऑगस्ट १९४७ रोजी मसुदा समितीची निवड झाली या समितीत सहा सदस्य होते. डॉ.आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली ही समिती तयार करण्यात आली. तिची पहिली बैठक दि.३० ऑगस्ट १९४७ रोजी झाली. मसुदा समितीने १४१ दिवस काम केले. घटना सल्लागारांनी मसुदा समितीसाठी तयार केलेल्या घटनेच्या पहिल्या मसुद्यात ३१५ कलमे व ८ परिच्छेद होते, हा मसुदा घटना समितीपुढे मांडण्यात आला. त्यावर विचारविनिमय होऊन शेवटी घटनेची कलमे ३८६ पर्यंत वाढली आणि अंतिमत: घटनेच्या मसुद्यात ३९५ कलमे व १२ परिच्छेद आले. या काळात घटना समितीची ११ अधिवेशने झाली होती. त्यापैकी सहा अधिवेशनात घटनेची ध्येय—उद्दिष्टे, संघराज्याची रचना, घटकराज्याची घटना, मुलभूत हक्क, अल्संख्यांक अनुसूचित जाती या विषयांवर चर्चा झाली होती. ७ ते ११ व्या अधिवेशात घटनेच्या मसुद्यावर चर्चा, विचारविनिमय, वादविवाद झाला होता. मसुदा समितीचे डॉ.आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली दि.२९ ऑगस्ट १९४७ ते दि.१९ फेब्रुवारी १९४८ अशा केवळ सहा

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

महिन्यांच्या कालावधीत संविधानाचा मसुदा अथक परिश्रमाने तयार केला. तो घटना समितीकडे दि.२० फेब्रुवारी १९४८ रोजी सादर करण्यात आला. जनतेच्या प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी सुचना मागविण्यासाठी मसुदा प्रकाशित करण्यात आला. घटना समितीच्या सदस्यांना मसुद्याचे सखोल अध्ययन करण्यासाठी वेळ देण्यात आला. त्यानंतर दि.१५ नोव्हेंबर १९४८ पासून दि.२६ नोव्हेंबर १९४९ पर्यंत घटना समितीमध्ये मसुद्यातील प्रत्येक तरतुदींवर सविस्तर चर्चा करून घटना समितीची मंजूरी देण्याचे कार्य पार पडले व डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या सहीने संविधानाला मंजूरी देण्यात आली. व दि.२६ जानेवारी १९५० रोजी आपले संविधान अमलात आले म्हणून दि.२६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा केला जातो.

**सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकतांत्रिक गणराज्य :—**

भारत अंतर्गत व बाह्य दृष्टिकोनातून पुर्ण सार्वभौम आहे. व्यक्तिस्वातंत्र्यासाठी समाजवाद, सर्व नागरिकांना आर्थिक न्याय आणि प्रतिष्ठा व प्रत्येकास संधीच्या बाबतीत समानतेचा संकल्प पत्रिकेत होता. धर्मनिरपेक्षता संकल्पनेत सर्व धर्म समान असतील, त्यांना समान धार्मिक अधिकार असतील. अशा अनेक गोष्टी भारतीय घटनेच्या अनेक कलमांमधून पाहावयास मिळतात. लोकशाही लोकतंत्रात्मकमध्ये भारतात राजकीय सत्तेचा वापर जनता किंवा जनतेच्या प्रतिनिधीमार्फत होईल. नकारात्मक दृष्टिकोनातून याचा विचार करता भारतात एका व्यक्तिचे, गटाचे, वर्गाचे वर्चस्व राहणार नाही. तर जनतेचे वर्चस्व राहिल. गणराज्य—भारतीय राज्याचे स्वरूप यातून स्पष्ट होते. सामाजिक, आर्थिक, राजकीय न्यायामध्ये जाती, धर्म, वंश, लिंग, संपतीच्या निकषावर फरक न करणे, उत्पादनांच्या व वितरणाच्या साधनांवर समाजाचा अधिकार असेल व उत्पादनांच्या साधनांचा उपयोग समाजहितासाठी केला जाईल. सर्व भारतीय नागरिकांना राजकारणात सहभागी होता येईल.

स्वतंत्रता, समानता, बंधूभाव, व्यक्तिची प्रतिष्ठा, राष्ट्राची एकता आणि अखंडता—भारतीय राज्यघटनेत या घटकांना महत्त्वाचे स्थान दिले आहे. अभिव्यक्ती, विश्वास, धर्म, उपासना या स्वतंत्र घटनेत स्थान दिलेले आहे. कलम १४, १५, १७, १८ मधून समानता घटनेने निर्माण केलेली आहे. बंधुभाव ही भावनाच देशामध्ये एकता व अखंडता निर्माण करण्यास सहाय्यभूत ठरते. तसेच भारतीय घटनाकारांनी व्यक्तीच्या प्रतिष्ठेस अत्युच्च स्थान दिलेले आहे. घटनेतील कलम ५१ क मध्ये अशी तरतुद आहे की सर्व नागरिकांनी देशाच्या सार्वभौमत्त्वाचे, एकतेचे, अखंडतेचे रक्षण करावे हे त्यांचे कर्तव्य आहे. या पत्रिकेमुळे भारतीय राजकीय व्यवस्थेचे लक्ष्य निश्चित झाले. लक्ष्य प्राप्तीसाठीचा मार्ग निश्चित झाला. जनता सार्वभौम व राजसत्तेचा स्त्रोत आहे हे स्पष्ट झाले. शासनास मार्गदर्शन करताना पथदर्शकाचे काम प्रस्तावना करते. हेच तिचे महत्व आहे. भारतीय घटनेची मूलभूत चौकट प्रस्तावना स्पष्ट करते.

**स्वातंत्र्य, समता, बंधुभाव :—**

स्वातंत्र्य, समता, बंधुभाव या तत्वांना फ्रेंच राज्यक्रांतीने जन्म दिला. आंबेडकरांनी पाश्चात्य इतिहास आणि विचारपरंपरा यांच्यापासून काहीही प्रेरणा घेतलेली नाही. फक्त गौतम बुध्दांकडून घेतली. ते म्हणतात माझे सामाजिक तत्वज्ञान हे निश्चितपणे तीन शब्दात गुंफले जाण्याचा संभव आहे. हे तीन शब्द म्हणजे स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव तथापि हे माझे तत्वज्ञान स्वातंत्र्य राज्यक्रांतीपासून उसने घेतले आहे, असे कोणी समजू नये. माझा गुरू बुध्द—त्यांच्या शिकवणीपासून ते काढले आहे. 'ॲनिहिलेशन ऑफ कास्ट' मध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुभाव यांची काहीशी तपशिलवार चर्चा केली आहे. त्यावरून, बंधुभाव त्यांना सर्वाधिक महत्त्वाचा वाट होता असे दिसते. समाजातील व्यक्तींनी स्वातंत्र्य असावे आणि व्यक्तिविकास हे त्याचे असावे असा डॉ.आंबेडकरांचा विचार होता. त्यांना अभिप्रेत असलेले स्वातंत्र्य हे नकारात्मक व्यक्तिवादी हक्कांपेक्षा भावनात्मक हक्कांना प्राधान्य देणारे स्वातंत्र्य हवे होते.

समतेच्या तत्वाची चर्चा डॉ.आंबेडकरांनी प्रामुख्याने भारतीय समाजातील विषमतेच्या संदर्भातच केली आहे. व्यक्तीमध्ये समानता प्रस्थापित केल्यानेच समाजाला व्यक्तींकडून अधिकाधिक योगदान मिळू शकेल असा काहीसा उपयुक्ततावाद डॉ.आंबेडकर मांडतात. निव्वळ समतेपेक्षा न्याय समान दर्जा आणि समान संधी यांना डॉ.आंबेडकर जास्त महत्व देतात. स्वातंत्र्य आणि समता यांच्यापेक्षाही डॉ.आंबेडकरांना बंधुभावाचे तत्व जास्त महत्वाचे वाटते.

तत्वज्ञानात बंधुतेला फार उच्च स्थान आहे. स्वातंत्र्य नि समता यांच्या विरूध्द संरक्षण फक्त बंधुभाव नेतच आहे असे ते म्हणतात. गतीक्षमता, परस्पर संवाद, सहकार्य व सहजीवन, समकेंद्री समाजरचना ही बंधुभावनेतच आहे असे ते म्हणतात. गतिक्षमता, परस्पर संवाद, सहकार्य व सहजीवन, समकेंद्री समाजरचना ही बंधुभावाची लक्षणे आहेत. ''बंधुभाव'' हे लोकशाहीचे दुसरे नाव होय. सभोवतालच्या मानसाला आदराची भावना म्हणजे बंधुभाव, न्याय हक्कांच्या पूर्ततेतून डॉ. आंबेडकरांचा बंधुभाव आकाराला येतो.

## समारोप :—

डॉ.आंबेडकरांनी संविधानामार्फत संसदिय लोकशाही शासन व्यवस्था भारतास दिली. ''लोकांच्या सामाजिक आर्थिक जीवनात रक्ताचा थेंबही न सांडता क्रांतीकारी परिवर्तने आणता येतील असे शासनाचे स्वरूप किंवा प्रणाली'' अशी लोकशाहीची व्याख्या त्यांनी केली. डॉ.आंबेडकर क्रांतीकारी होते पण त्याचवेळी निस्सीम संविधानवादीही होते. लोकशाही म्हणजे सुवर्ण मध्य, लोकशाही म्हणजे बुध्दाचा मार्ग, लोकशाही ही कृतीची सर्वोत्तम आणि सुरक्षित पध्दती होय अशी त्यांची धारणा होती. या देशातील दलित आणि अल्पसंख्याकाच्या भवितव्याविषयीची त्यांची संकल्पना ही त्यांच्या मुलगामी तत्वज्ञानाशी सुसंगत होती.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना संविधानामार्फत जातिविरहीत समाजाची निर्मिती करावयाची होती. त्यांचा हा आदर्श समाज, स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या तत्वांवर आधारित होता. आणि ते त्यांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून प्रस्थापित केला. कारण भारत हे राष्ट्र चिरकाल टिकणारी व्यवस्था आहे. बदलत्या काळानुसार शेकडो, हजारो वर्षानंतर सुध्दा घटनेचे अस्तित्व आणि पावित्र्य अबाधित राहिले पाहिजे एवढी दूरदृष्टी ठेवून घटना निर्माण करण्याचे आव्हान घटना समितीतील सदस्यांच्या साथीने साकार करण्याचे कार्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी पूर्ण केले.

## संदर्भ सूची

१. नवसागरे(डॉ.) नितीश, न्यायपालिका, प्रशासन, संरक्षण, चरित्र कोश, हिंदुस्थान प्रकाशन संस्था, मुंबई २०११, पान २६
२. अपराजित श्रीपाद,लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन मुंबई, २०१६, पान २६.
३. कळसे(डॉ.) अनंत, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताच्या घटना समितीसमोर दि.४ नोव्हेंबर १९४८ रोजी केलेले भाषण, महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई,२०१३.पान १७.
४. चौसाळकर(डॉ.) अशोक, नवरात्र, लोकवाङ्मय गृह, मुंबई २०००, पान १७१.
५. ग्रॅनव्हिल ऑस्टिन,भारताची राज्यघटना:राष्ट्राची कोनशिला, डायमंड पब्लिकेशन, पुणे २०१३, पान ३२, ३३.
६. गायकवाड जयदेव, संविधान सभेत डॉ.आंबेडकर, पद्मगंधा प्रकाशन, पुणे २०००, पान २७३, २७४.
७. बिपीनचंद्रा, इंडिया अफ्टर इंडिपेंडन्स अनुवाद मुखजी मृदुला, मुखर्जी आदित्य, के.सागर पब्लिकेशन, पुणे, २०१२, पान ७३.
८. वाघमारे(डॉ.) जनार्दन, सहा राष्ट्रपुरूष, महाराष्ट्र विधानपरिषद, सुवर्ण महोत्सव समिती, मुंबई. पान ९६.
९. गायकवाड प्रदिप, भारताचे संविधानाचे शिल्पकार भाग—१, समता प्रकाशन, नागपूर २०१०, पान १२ ते १३
१०. किर धनंजय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९८९पान २०५.